R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४६

दि.२८ जानेवारी २०२६,वार: बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस परेडचे नेतृत्व करणारे समीर सिंह साळवे यांचे कौतुक

लातूर :- लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी



समीर सिंह साळवे यांनी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी आयोजित पोलीस परेडचे यशस्वी नेतृत्व केले. त्यांच्या शिस्तबद्ध, प्रभावी व प्रेरणादायी नेतृत्वाबद्दल अशोक हनवते, संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई), जिल्हा शाखा लातूर यांनी त्यांचे विशेष कौतुक करत प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी अशोक हनवते यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्याची प्रशंसा करत, राष्ट्रीय सणांच्या माध्यमातून समाजात शिस्त, देशभक्ती व एकतेची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले. लातूर शहर

उपविभागीय पोलीस अधिकारी समीर सिंह साळवे



यांनीही नागरिकांच्या सहकार्याबद्दल आभार मानले.

या प्रसंगी समीर सिंह साळवे यांचा त्यांच्या मुलासोबतचा आपुलकीचा क्षण उपस्थितांच्या लक्षात राहिला. कर्तव्यदक्ष अधिकारी आणि जबाबदार पालक अशी त्यांची ओळख या निमित्ताने अधोरेखित झाली.

फोटो: अशोक हनवते (संपादक, दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर ) यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त उपविभागीय पोलीस अधिकारी समीर सिंह साळवे यांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या; यावेळी साळवे यांचा मुलगा उपस्थित.

## जिल्हा परिषदेच्या १० व पंचायत समितीच्या २५ जागा वंचित बहुजन आघाडी स्वबळावर लढणार संतोष सुर्यवंशी

लातूर । प्रतिनिधी–लातूर जिल्हा परिषदेच्या




आगामी निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या १२ गटांच्या जागांवर तसेच जिल्ह्यातील १० पंचायत समिती गणांमधील २५ जागांवर उमेदवार कायम ठेवण्यात आले असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सुर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवारी सायंकाळी हॉटेल रसिका येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संतोष सुर्यवंशी म्हणाले की, लातूर महानगरपालिकेप्रमाणे जिल्हा परिषद निवडणुकीतही आघाडी होण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांसोबत उमेदवारी अर्ज परत घेण्याच्या अंतिम वेळेपर्यंत प्रयत्न करण्यात आले. मात्र, जिथे काँग्रेस जिथे स्वतः निवडून येऊ शकत नाही अश्या जागा वंचित बहुजन आघाडीच्या वाट्याला देत होते जसे कि तंबाळा खरोसा मुरुड, सन्मानजनक तोडगा न निघाल्याने पक्षाने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला.

ते पुढे म्हणाले की, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रिंगणात असून, त्यांच्यासाठी जोरदार प्रचार केला जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शाळा बंद पाडून शाळांच्या जागा स्वतःच्या संस्थेच्या घश्यात घालून त्यांच्या जागा बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना पायबंद घालण्यात येईल.

सामान्यांच्या मुलांना दर्जेदार व विनामूल्य शिक्षण, शेतकऱ्यांना खते व बियाणे मोफय बांधावर पुरवले जाईल, घरकुल योजनेसाठी ५,००००० लाख निधी, विहीर खोदण्यासाठीशेतकऱ्याच्या खात्यावर अधिक अनुदान, तसेच शेतमजुरांना शेतीकाम नसलेल्या काळात शासकीय अनुदान व रोजगाराच्या संधी देण्यासाठी ठोस धोरण राबविले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.तसेच काँग्रेस राष्ट्रवादी यांनी वंचित बहुजन आघाडीचे नाव व श्रद्धेय प्रकाशजी तथा बाळासाहेब आंबेडकर साहेबांचे नाव युती होण्याच्या अगोदर वापरण्याच्या प्रयत्न करून स्वतःचा कमकुवतपना दाखवून दिला आहे त्यांनी पक्ष्याचे नाव व फोटो कुठेही वापरू नये आमचा कुठंच काँग्रेसला पाठिंबा नाही लोकांमध्ये संभ्रम निर्माण करू नये

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार चांगल्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त करत मतदारांनी वंचितच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन संतोष सुर्यवंशी यांनी केले.

या पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे लातूर जिल्हा निरीक्षक सिद्धोधन सावंत, जिल्हा महासचिव अ‍ॅड. रोहित सोमवंशी, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा मंजूषा निंबाळकर, शहर महासचिव आकाश इंगळे, युवा जिल्हाध्यक्ष गायकवाड, डॉ. विजय अजनीकर, डॉ. हिरालाल निंबाळकर, प्रा. प्रशांत उघाडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## केंद्र सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?- कॉ. उत्तम होळीकर.

लातूर :-इंडियन बँक्स असोसिएशन आणि बँक कर्मचारी, अधिकारी संघटना यांचे मध्ये करारानुसार पाच दिवसांचा आठवडा मान्य होऊन दोन वर्षे उलटली तरीही मोदी सरकारने अद्याप याला मान्यता दिलेली नाही. संसदेतील पाशवी बहुमताची घमेंड जर या सरकारला येऊन भाजपच्या नेहमीचा जुमला करू अशी मस्ती या सरकारला





आली असेल, तर ती मस्ती जिरवण्याची ताकद बँक कर्मचारी अधिकारी बाळगून आहेत. या सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? असा संतप्त सवाल बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ.उत्तम होळीकर यांनी विचारला.आज देशभरातील सर्व बँकातिल सर्व संघटनांचे कर्मचारी यांनी राष्ट्रव्यापी संप पुकारला होता.त्या निमित्त लातूरच्या स्टेट बँकेसमोर सर्वांनी सरकारच्या गर्विष्ठ पनावर राग व्यक्त करीत सरकार विरोधात संतप्त निदर्शने केली. त्यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, पाशवी बहुमताची मोदी सरकारला घमेंड चढली आहे.गेली ११ वर्षे देशवासीयांना जुमला करून या सरकारने मूर्ख बनविले आहे. तसाच प्रकार आता ते बँक कर्मचारी अधिकारी यांचे सोबत करीत आहे पण या सरकारने हे लक्षात घ्यावे की यांची गाठ आमच्याशी आहे. पाच दिवसांचा आठवडा तर मिळवूच पण येत्या १ फेब्रुवारी रोजी देशाच्या अर्थसंकल्पात हे सरकार मॉनिटायझेशन या नावाने देशाची संपत्ती कोण कोणत्या अडाणी अंबानी यांना विकणार आहे, बँकिंग गव्हर्नन्स बील या नावाने बँकांचे समिलीकरण,खाजगीकरण करणार याचेवर लक्ष ठेवून रहा. हे विधेयक येताच लाईटनिग कॉल वरती आपणास संप करावयाचा आहे आणि देश मोदी सरकारच्या हल्लयातून वाचवायचा आहे, हे लक्षात घ्या. हे सरकार मताला आणि सत्तेला घाबरते म्हणून या सरकारची दुखरी नस ओळखा आणि पूर्ण ताकदीचा संघर्ष जो उभा राहील, त्यात देशहितासाठी झोकून द्या, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

बदलत्या बँकिंग परिस्थिती मध्ये कामकाज व जीवन संतुलनसाठी पाच दिवसांचा आठवडा ही बँक कर्मचाऱ्यांसाठी काळाची गरज बनलेली असताना सुद्धा आडमुठेपणाने स्वतः मान्य केलेली मागणी लागू करण्यास केंद्र सरकारकडून टाळाटाळ होते आहे ज्याचे पर्यावसन आजच्या संपात झालेले आहे. द्विपक्ष करारावेळी मान्य केलेला शब्द केंद्र सरकारने तात्काळ पाळावा अन्यथा बेमुदत संपावर जाण्याशिवाय बँक कर्मचाऱ्यांकडे दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहणार नसल्याचा इशारा यावेळी बँक कर्मचाऱ्यांचे तरुण नेते कॉम्रेड दीपक माने यांनी दिला. भारतीय इतिहासात प्रथमतः बँक कर्मचाऱ्यांचा संप दडपुन टाकण्यासाठी केंद्र सरकारने वित्त विभागास मैदानात उतरवले आहे. सर्व बँकांच्या चेअरमन ची ऑनलाइन मीटिंग घेऊन संपावरती नसलेल्या बँक कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन बँकिंग व्यवहार सुरळीत ठेवावा व बँक कर्मचाऱ्यांचा संप हाणून पाडावा अशा सक्त सूचना कधी नव्हे त्या प्रथमच वित्त विभागाकडून जारी करण्यात आल्या आहेत. गरज पडल्यास बँकिंग व्यवस्था सुरळीत चालू ठेवण्यासाठी व कर्मचाऱ्यांचा संप हाणून पाडण्यासाठी पोलीस विभागाची सुद्धा मदत घ्या व यासाठी प्रत्येक राज्यांच्या पोलीस महासंचालकांना सुद्धा ऑनलाईन मीटिंग द्वारे तशा सूचना देण्यात आल्या आहेत. एक प्रकारे पाशवी बहुमताच्या जोरावर हा सत्तेचा मुजोरपणा व माजच म्हणायला हवा. परंतु लोकांच्या असलेल्या पाठिंबाच्या बळावरती मोदी सरकारच्या सत्तेचा माज बँक कर्मचारी नक्कीच उतरतील व शेतकरी आंदोलनाप्रमाणेच सरकारला परत गुडघे टेकायला भाग पाडतील . नारायण आणि सुधा मूर्ती सारखे ब्रिटिश चमचे भांडवलदार बेशरमपणे कामगार शोषणाची भलामन करीत आहेत.या जोडप्याने हिंजवडीची जागा किती नाममात्र पैशात लुटली हे तपासावे.तसेच इन्फोसिसच्या इंजिनियर्स तरुणांनी या मूर्ती दांपत्यास धडा शिकविण्याचे आवाहन सुद्धा कॉ.दीपक माने यांनी केले. या देशामध्ये कोणीही सत्तेचा अमर पट्टा घेऊन जन्माला आलेला नाही त्यामुळे या देशातील जनता सर्वश्रेष्ठ आहे; मोदींचे सरकार नाही हे मोदी सरकारने लक्षात ठेवावे. पाच दिवसांच्या आठवड्याची मागणी ही फक्त बँक कर्मचाऱ्यांची मागणी नसून ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी मानसिकदृष्ट्या व शारीरिकदृष्ट्या कर्मचारी सक्षम असला पाहिजे व त्यासाठी पाच दिवसाचा आठवडा अत्यावश्यक बनलेला असताना सुद्धा कुठल्याही नैतिक व सामाजिक संकेतांना न जुमानता मनमानी पद्धतीने वागणाऱ्या या सरकारच्या विरोधात नाईलाजाने आज आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले असल्याचे ग्रामीण बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. सावंत यांनी स्पष्ट केले.

मागील काही वर्षात बँकांमध्ये कामाचा बोजा कैक पटीने वाढलेला आहे. आठ तासाचे कामाचे स्वरूप असतानाही दहा ते बारा तास बँकेत बसून तसेच सुट्टी दिवशीही बँकेत येऊन प्रलंबित कामे करावी लागत आहेत. बँकांचा व्यवसाय अनेक पटीने वाढलेला असताना सुद्धा कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी होताना दिसत आहे ज्यामुळे बँक कर्मचारी प्रचंड तणावाखाली काम करीत आहेत. एकीकडे कामाचा बोजा वाढत असताना केंद्र सरकार बँकांमधून कर्मचाऱ्यांची पुरेशी भरती सुद्धा करायला तयार नाही. या वाढलेल्या कामाच्या ओझ्यामुळे कामकाज व जीवन संतुलन यामधील समतोल पूर्णतः बिघडलेला आहे ज्याचा परिणाम बँक कर्मचाऱ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावरती प्रखरतेने जाणवत आहे म्हणूनच बँक कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा अत्यावश्यक झालेला आहे परंतु असे असतानाही आयबीए व केंद्र सरकारकडून पाच दिवसाच्या आठवड्या बाबत कुठलेही सकारात्मक पाऊल उचलले जात नाही व त्यासंदर्भात केवळ कर्मचाऱ्यांना आशेवरती ठेवले जात आहे. बाराव्या द्विपक्षीय करारावेळी सहा महिन्याच्या आत पाच दिवसांचा आठवडा लागू करूयात असे आयबीए व युनायटेड फोर अंतर्गत ठरलेले असताना सुद्धा व या गोष्टीला दोन वर्षे होत आलेली असताना सुद्धा यासंदर्भात कुठलीही सकारात्मक हालचाल घडताना दिसून येत नाही म्हणूनच युनायटेड फोरमने देशभरामध्ये २७ जानेवारी रोजी संपाची हाक दिलेली आहे. बँक .कर्मचाऱ्यांची इच्छा नसतानाही त्यांच्यावरती हा संप लादला गेलेला आहे असे ग्रामीण बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड राहुल सावंत यांनी स्पष्ट केले.

सलगच्या सुट्ट्या व बँक कर्मचाऱ्यांचा संप यामुळे देशभरातील संपूर्ण बँकिंग व्यवहार ठप्प झालेले आहे व ग्राहकांची अतोनात गैरसोय होते आहे परंतु याला बँक कर्मचारी नव्हे तर केंद्र सरकार व त्यांचे आडमुठे धोरण जबाबदार आहे. केंद्र सरकारने बँक कर्मचाऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये अन्यथा बेमुदत संपाची हाक युनायटेड फोरमला द्यावी लागेल. संघर्षाच्या माध्यमातून कालपर्यंतही बँक कर्मचाऱ्यांचाच विजय झालेला आहे व केंद्र सरकारच्या आडमुठे धोरणाच्या विरोधात संघटितपणे दिलेल्या या लढ्यामुळे बँक कर्मचारी जिंकतील व केंद्र सरकारने मान्य केलेली मागणी त्यांना लागू करायला लावल्याशिवाय बँक कर्मचारी आता शांत बसणार नाहीत असा विश्वास यावेळी बालाजी बावलगे यांनी व्यक्त केला.

यावेळी सचिन नंदागवळे, अंजली स्वामी, परमेश्वर बडगिरे, अनुप देशमुख, स्वप्निल जाधव, राजू दुलेवाड ,सचिन एकोरगे, रेश्मा भवरे, महेश गांधले, प्रीतम गिरी गोसावी यांच्यासह लातूर शहर व परिसरातील दोनशे ते तीनशे बँक कर्मचारी उपस्थित होते.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

### भारतीय संविधान : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतुलनीय योगदान

भारतीय लोकशाहीचा कणा असलेले भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे संकलन नसून स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या मूल्यांवर आधारित एक जिवंत दस्तऐवज आहे. या महान संविधानाच्या निर्मितीमागे ज्यांचे अतुलनीय योगदान आहे, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी भारतीय संविधान लिहिण्यासाठी घेतलेले परिश्रम हे भारतीय इतिहासातील एक सुवर्णपान आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वांत मोठे आव्हान होतेविविध जाती, धर्म, भाषा, प्रांत आणि सामाजिक विषमता असलेल्या देशासाठी एक सशक्त व न्याय्य संविधान निर्माण करणे. या ऐतिहासिक जबाबदारीसाठी घटनात्मक मसुदा समितीचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे सोपवण्यात आले. कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राजकारण यांचे सखोल ज्ञान आणि जागतिक राज्यघटनांचा अभ्यास असलेले बाबासाहेब या कार्यासाठी सर्वार्थाने सक्षम होते.

भारतीय संविधानाची निर्मिती ही अत्यंत कष्टप्रद व दीर्घ प्रक्रिया होती. तब्बल २ वर्षे ११ महिने १८ दिवस दिवस-रात्र अथक परिश्रम घेत हा संविधान मसुदा तयार करण्यात आला. जगातील अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आदी देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास करून, भारतीय समाजरचनेला अनुरूप अशा तरतुदी संविधानात समाविष्ट करण्यात आल्या. अखेर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान पूर्ण झाले. हा दिवस आज संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.तथापि, संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली आणि भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष व लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगाच्या पटलावर उभा राहिला. या दिवशी भारतीय नागरिकांना स्वतःचे अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव करून देणारी शासनव्यवस्था अस्तित्वात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून केवळ शासनयंत्रणेची चौकट उभी केली नाही, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवली. अस्पृश्यता नष्ट करणे, कायद्यापुढे सर्वांना समानता, धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, तसेच मागासवर्गीयांसाठी आरक्षण यांसारख्या तरतुदी त्यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांचे मूर्त रूप आहेत. विशेषतः मूलभूत अधिकार आणि राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमुळे भारतीय लोकशाहीला नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले.बाबासाहेबांनी संविधानावर चर्चा करताना स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, राज्यघटना कितीही चांगली असली तरी ती अंमलात आणणारे लोक चांगले नसतील तर तिचे यश धोक्यात येते. म्हणूनच संविधानाचा आदर करणे म्हणजे केवळ कायद्याचे पालन नव्हे, तर लोकशाही मूल्यांचे आचरण करणे होय.आजच्या बदलत्या काळात, जेव्हा संविधानाच्या मूल्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसते, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अधिकच मार्गदर्शक ठरतात. संविधान हे काळानुसार दुरुस्तीक्षम असले तरी त्याची मूलतत्त्वेसमता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुताअढळ आहेत. ही तत्त्वे जपली गेली नाहीत, तर लोकशाहीचे अस्तित्वच संकटात येऊ शकते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहिताना स्वतःच्या आरोग्याची व वैयक्तिक आयुष्याचीही पर्वा केली नाही. त्यांच्या या त्यागामुळेच आज प्रत्येक सामान्य नागरिकाला हक्कांसह सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे. संविधान हा केवळ कायद्यांचा ग्रंथ नसून, तो सामाजिक समतेचा दीपस्तंभ आहे.म्हणूनच २६ नोव्हेंबर (संविधान दिन) आणि २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) हे दिवस केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या महान कार्याची, त्यागाची व संविधानात्मक विचारांची आठवण प्रत्येक भारतीयाने आवर्जून केली पाहिजे. भारतीय संविधानाचे रक्षण करणे, त्यातील मूल्ये आचरणात आणणे आणि समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी कटिबद्ध राहणे, हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी मानवंदना ठरेल.

# बुवाबाजी : आंबेडकरी विवेकाचा पराभव की सामाजिक आत्महत्या?

भारतीय समाजाच्या इतिहासात अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक समस्या राहिलेली नाही; ती सत्ता, अर्थकारण आणि मानसिक गुलामी यांचे सर्वात प्रभावी साधन बनली आहे. विज्ञान, शिक्षण आणि लोकशाही यांच्या युगातही बुवाबाजी टिकून आहे, याचा अर्थ समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केला असला तरी विवेकाचा स्वीकार केलेला नाही. विदर्भातील विक्तूबाबा ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती संपूर्ण समाजाच्या वैचारिक अपयशाची आरसेदर्शी कहाणी आहे. विदर्भातील मोठ्या बाबांपैकी एक म्हणजे विक्तूबाबा. नागपूर जिल्ह्यात त्याचे भव्य देवस्थान उभे आहे. आज हे देवस्थान कोट्यधीश बनले आहे. पण या देवस्थानामागील वास्तव वेगळे आहे. वास्तविक पाहता विक्तूबाबा हा मानसिकदृष्ट्या अपंग मुलगा होता. वयात आल्यानंतर स्त्रिया दिसल्या की चावायला धावायचा; म्हणून त्याच्या नातेवाईकांनी त्याच्या हातापायात बेड्या घातल्या. हाच पुढे बेडीवाले-विक्तूबाबा म्हणून प्रसिद्ध झाला. दलित समाजामध्ये या बाबाला फार मानाचे स्थान मिळाले आणि प्रचंड जनसमुदाय त्याच्यावर श्रद्धा ठेवू लागला. एका मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीला देवत्व देणे, त्याच्या विकृतीला चमत्काराचे रूप देणे आणि त्याच्या नावावर कोट्यवधी रुपयांचे देवस्थान उभे राहणे हे श्रद्धेचे नव्हे, तर विवेकाच्या पराभवाचे लक्षण आहे. समाजाने जेव्हा प्रश्न विचारणे थांबवले, तेव्हा बुवाबाजी जन्माला येते. बुवाबाजी ही अंधश्रद्धेची आधुनिक आवृत्ती आहे. ती देवाच्या नावाने नव्हे, तर माणसाच्या नावाने चालते म्हणूनच ती अधिक धोकादायक आहे. बुद्धांचा विचार याच बुवाबाजीच्या मुळावर घाव घालणारा आहे.

बालपणी मी स्वतः विक्तूबाबाला पाहिले आहे. सतत घाणेरड्या शिव्या देणारा, हातापायात बेड्या असणारा हा बाबा; ज्याच्या भोवती भक्तांचा गराडा असायचा. त्याच्या प्रत्येक पागल हावभावाचा भक्त आपापल्या परीने अर्थ काढायचे. मोठ्या प्रमाणावर पेढे, नारळ, पैसे बाबाला वाहिले जायचे आणि त्याच वस्तू पुन्हा दुकानांत विक्रीला ठेवण्यात यायच्या. टी.बी., महारोग आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे रुग्णही विक्तूबाबाकडे येताना मी पाहिले. त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधल्यावर बाबाच्या कृपेने रोग बरे होतात हा केवळ विश्वास नव्हे, तर अनुभव असल्याचा दावा ऐकून मी स्तब्ध झालो. कारण विक्तूबाबांची आई महारोगाची रुग्ण होती आणि ती बाबा आमटेंच्या दवाखान्यात दीर्घकाळ उपचार घेत होती. विक्तूबाबाच्या घाणेरड्या शिव्यांतूनही चांगला अर्थ काढण्याचा भक्तांचा अट्टाहास विलक्षण होता. काही भक्त तर मुद्दाम बाबाला त्रास देत, जेणेकरून त्याने शिव्या द्याव्यात. त्या शिव्या मोजून काही लोक सट्टा-जुगार लावत असत. हा प्रकार केवळ हास्यास्पद नव्हे, तर समाजाच्या मानसिक अधःपतनाचे प्रतीक होता. आजही काही लोक लग्नाची पत्रिका समाजात वाटण्यापूर्वी विक्तूबाबाच्या चरणी ठेवतात. हा केवळ श्रद्धेचा प्रश्न नाही; तो मानसिक गुलामीचा पुरावा आहे. जीवनातील प्रत्येक निर्णय स्वतःच्या बुद्धीने घेण्याऐवजी बाबाच्या आशीर्वादावर अवलंबून राहणे म्हणजे विवेकाचा त्याग होय.

बुद्धाने सांगितले अत्त-दीप-भव, म्हणजे स्वतःचा दिवा व्हा. पण आजचा समाज म्हणतो, बाबाचा दिवा व्हा. हा फरक केवळ शब्दांचा नाही; तो मानसिकतेचा आहे. बुद्धधम्माचा अर्थ देव बदलणे नव्हे, तर विचार बदलणे आहे. जो समाज बुद्धाचा धर्म स्वीकारूनही चमत्कार शोधतो, तो बुद्धाचा नाही, तर बुवांचा अनुयायी ठरतो. म्हणूनच बुवाबाजी ही केवळ धार्मिक समस्या नाही; ती बुद्धविचाराच्या पराभवाची चिन्हे आहेत. जर बुद्धाचा विचार खरोखर स्वीकारायचा असेल, तर बुवाबाजीला केवळ विरोध करणे पुरेसे नाही; तिच्या मुळावरच घाव घालावा लागेल. कारण बुद्धाचा मार्ग स्पष्ट आहे, श्रद्धेपासून विवेकाकडे, देवापासून मानवाकडे आणि चमत्कारापासून विज्ञानाकडे. बुद्धाने देव, चमत्कार आणि अंधश्रद्धा यांना थेट आव्हान दिले. कोणत्याही गोष्टीवर केवळ परंपरेमुळे, धर्मामुळे किंवा कोणाच्या सांगण्यामुळे विश्वास ठेवू नका; स्वतःच्या बुद्धीने तपासून पाहा हा बुद्धाचा मूलमंत्र होता. त्यामुळे बुद्धधम्म हा पूजा, कर्मकांड किंवा बाबागिरीचा धर्म नाही, तर विवेक, अनुभव आणि तर्काचा धर्म आहे. बुद्धाने सांगितले की दुःखाचे कारण बाहेर नाही; ते आपल्या आत आहे. त्यामुळे दुःखावर उपाय शोधताना देव, बाबा किंवा चमत्कार शोधण्याची गरज नाही; गरज आहे ती स्वतःच्या बुद्धीची. विडंबन असे की बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच बुवाबाजी फोफावली आहे. बुद्धाच्या नावाने धर्म स्वीकारणारा समाज बाबांच्या चरणी नतमस्तक होतो ही केवळ विसंगती नाही; ती बुद्धविचाराची विटंबना आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत; त्यांनी त्याला विचार करण्याची शक्ती दिली. बाबासाहेबांचा धर्म हा देवाचा नव्हे, तर माणसाचा धर्म होता. बुद्धधम्म स्वीकारताना त्यांनी स्पष्ट सांगितले, श्रद्धा नव्हे, बुद्धी. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि देववाद यांना स्पष्ट नकार दिला. पण आज प्रश्न उभा राहतोआपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत की त्यांच्या नावावर जगणारे भक्त? हजारो घरांमध्ये बाबासाहेब आंबेडकर आणि विक्तूबाबांचे फोटो शेजारी लावलेले दिसतात. हा केवळ प्रतीकात्मक विरोधाभास नाही; तो वैचारिक शून्याचा पुरावा आहे. दीक्षाभूमी ही केवळ भूभाग नाही; ती विवेकाची क्रांती आहे. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी लाखो लोकांना अंधश्रद्धेपासून मुक्त केले, त्याच भूमीवर विक्तूबाबाचा सत्कार होणे म्हणजे बुद्धिवादाची सार्वजनिक हत्या आहे. याविरोधात मोजकेच बुद्धिवादी आवाज उठले; बहुसंख्य आंबेडकरी नेते मात्र गप्प राहिले. का? कारण भक्तांचा रोष, मतांचा तोटा आणि राजकीय नुकसान. इथे प्रश्न उभा राहतो राजकारणासाठी विवेकाचा बळी देणे ही आंबेडकरी चळवळ आहे का? जर हो, तर बाबासाहेबांचा विचार केवळ निवडणूक घोषणापत्रापुरता मर्यादित राहिला आहे, हे स्वीकारावे लागेल.

विक्तूबाबाचे देवस्थान आज कोट्यधीश आहे. हजारो भक्त दरवर्षी दर्शनाला येतात. नारळ, पेढे, पैसे, वस्त्र, दान या सगळ्यांतून एक प्रचंड अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. बुवाबाजी ही आज केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक उद्योग बनली आहे. प्रश्न असा आहे हा पैसा कुठून येतो? तो येतो गरीब, असुरक्षित आणि असहाय लोकांकडून. जेव्हा राज्य त्यांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगार देण्यात अपयशी ठरते, तेव्हा ते बाबांकडे धाव घेतात. म्हणजेच बुवाबाजी ही व्यवस्थेच्या अपयशाची उपज आहे. टी.बी., कॅन्सर, महारोग यांसारख्या रोगांवर बाबाच्या कृपेने उपचार होतात, असा विश्वास म्हणजे विज्ञानाचा अपमान आहे. पण या विश्वासामागे असलेली मानसिकता अधिक धोकादायक आहे, आपण स्वतः काही करू शकत नाही, कोणीतरी चमत्कार करावा लागेल. ही मानसिकता म्हणजेच मानसिक गुलामी.

सामान्यतः अंधश्रद्धा ही ग्रामीण समाजाशी जोडली जाते. पण दलित समाजात तिचे अस्तित्व अधिक खोलवर आहे. कारण दलित समाजाने ऐतिहासिकदृष्ट्या सतत अपमान, शोषण आणि अन्याय सहन केला आहे. त्यामुळे त्याच्या मनात असुरक्षितता, भीती आणि आश्रयाची गरज निर्माण झाली आहे. बुवाबाजी ही त्या मानसिकतेचा परिणाम आहे. बाबासाहेबांनी दलित समाजाला मानसिक गुलामीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. पण सामाजिक चळवळ दुर्बल झाल्यामुळे ती गुलामी नव्या रूपात परत आली, बुवाबाजीच्या रूपात. आज आंबेडकरी चळवळ राजकीयदृष्ट्या सक्रिय आहे. निवडणुका, मोर्चे, सभा, घोषणा सगळे सुरू आहे. पण सामाजिक चळवळ मात्र निष्प्रभ झाली आहे. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर सामाजिक परिवर्तनाची मशाल कोणीच उचलली नाही. परिणामी, बाबासाहेबांचा फोटो सर्वत्र दिसतो; पण त्यांचा विचार समाजात दिसत नाही. आंबेडकरी चळवळ जर खरोखरच बाबासाहेबांची वारसदार असती, तर बुवाबाजीविरोधात ती सर्वात पुढे उभी राहिली असती. पण वास्तव उलट आहे. बुवाबाजीवर टीका केली की भावना दुखावतात असा युक्तिवाद केला जातो. प्रश्न असा आहे, भावना जपायच्या की विवेक?

बुद्धाने सांगितले काहीही अंधश्रद्धेने स्वीकारू नका. बाबासाहेबांनी त्याच विचाराला आधुनिक संदर्भ दिला. पण आज बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच अंगात येणारे बुद्ध, अंगात येणारे बाबासाहेब दिसतात. हा विरोधाभास केवळ हास्यास्पद नाही; तो धोकादायक आहे. कारण जेव्हा विचाराऐवजी चमत्कार महत्त्वाचा ठरतो, तेव्हा समाज पुन्हा मध्ययुगात परत जातो. प्रश्न विक्तूबाबाचा नाही; प्रश्न आपला आहे. विक्तूबाबा ही समस्या नाही; समस्या म्हणजे त्याला देवत्व देणारा समाज. विक्तूबाबा उद्या नाहीसा झाला, तरी उद्या दुसरा बाबा तयार होईल. कारण समाजाची मानसिकता बदललेली नाही. जो समाज बाबासाहेबांच्या नावाने राजकारण करतो, तोच समाज बुवांच्या चरणी नतमस्तक होतो, हा विरोधाभास केवळ वैचारिक नाही, तर नैतिकही आहे. आज समाजासमोर प्रश्न स्पष्ट आहे, आपण बाबासाहेबांच्या बाजूने उभे राहणार की बुवांच्या? बाबासाहेब म्हणजे प्रश्न विचारण्याची परंपरा. बुवा म्हणजे प्रश्न न विचारण्याची गुलामी. बाबासाहेब म्हणजे विज्ञान, तर्क आणि मानवतावाद, बुवा म्हणजे चमत्कार, अंधश्रद्धा आणि भीती. दोन्ही एकत्र चालू शकत नाहीत.


आता वेळ आली आहे की आंबेडकरी समाजाने आत्मपरीक्षण करावे. बाबासाहेबांचे फोटो घरात लावणे पुरेसे नाही; त्यांचा विचार जीवनात उतरवावा लागेल. जर तुमच्या घरात बुवाचा फोटो आहे, तर बाबासाहेबांचा फोटो केवळ सजावटीचा आहे, हे स्वीकारावे लागेल. जर तुम्ही बुवांच्या चरणी नतमस्तक होता, तर बाबासाहेबांच्या विचारांशी तुम्ही द्रोह करत आहात, हे मान्य करावे लागेल. आज गरज आहे ती निर्भीड वैचारिक क्रांतीची. बुवाबाजी विरोधात उभे राहणे म्हणजे धर्मविरोध नाही; ते मानवतावादाचे समर्थन आहे. अंधश्रद्धेविरोधात बोलणे म्हणजे समाजविरोध नाही; ते समाजाच्या मुक्तीसाठीचे युद्ध आहे. जर आंबेडकरी समाजाने आता प्रश्न विचारले नाहीत, तर भविष्यात बाबासाहेबांचा विचार केवळ पुस्तकांमध्ये उरेल आणि बुवाबाजी समाजावर राज्य करेल. म्हणूनच आजच निर्णय घ्या, देव नव्हे, विचार स्वीकारा! चमत्कार नव्हे, विज्ञान स्वीकारा! बुवा नव्हे, बाबासाहेब स्वीकारा! कारण विवेक हीच खरी क्रांती आहे आणि विवेकाशिवाय कोणतीही मुक्ती शक्य नाही !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# केज येथे भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास ह.भ.प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांच्या मधुर वाणीतून कथेस प्रारंभ

केज/प्रतिनिधी-केज शहरात सोमवार पासून श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कथाकार म्हणून ह.भ.प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांच्या मधुर वाणीतून कथेस प्रारंभ झाला आहे आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प. विष्णु महाराज शास्त्री चिंचोली माळी यांनी आवाहन केले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार,ह.भ.प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ दत्ता धस, डॉ.ढाकणे साहेब यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या श्रीफळ फोडून भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला.

यावेळी बोलताना ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार म्हणाले की, प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ह.भ.स.भागवत भुषण केशव महाराज शास्त्री यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली भगवान श्रीकृष्ण आश्रम भक्त परिवार यांच्या वतीने मागील चार ते पाच वर्षापासून शहरांमध्ये उत्कृष्ट प्रकारचे भागवत कथेचे आयोजन करत आहेत. प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी आम्ही जनविकास फाउंडेशनच्या माध्यमातून कथेच्या सांगता कार्यक्रमाच्या दिवशी अन्नदान करणार आहोत याही वर्षी ह.भ.प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांनी आम्हाला भक्तांची सेवा करण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांनी महाराजांचे आभार व्यक्त केले. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, या कथेच्या माध्यमातून महाराज भोजनाच्या व्यतिरिक्त आणखीन जे जबाबदारी देतात अथवा



सेवा करण्याची संधी देतील ती सेवा करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. प्रत्येक सेवा करण्यासाठी महाराजांनी आम्हाला विनंती करण्याची गरज नाही.महाराजांनी आम्हाला आदेश द्यावेत त्या आदेशाचे पालन आम्ही करण्यास तत्पर आहोत. केज शहरात प्रत्येक वर्षी महाराजांनी असाच उपक्रम घ्यावा व आम्हाला सेवा करण्याची संधी द्यावी आम्ही दरवर्षीप्रमाणे सेवा करू असे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी महाराजांना आश्वासन दिले.भगवान श्रीकृष्ण आश्रम भक्त परिवार यांच्या वतीने प्रत्येक वर्षी भागवत कथेचे आयोजन करण्यात येत आहे त्याच अनुषंगाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ पासून भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कथेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

सोमवार दिनांक २६ जानेवारी ते रविवार दिनांक १ फेब्रुवारी पर्यंत दररोज दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा केज शहरातील पंचायत समितीच्या भव्य प्रांगणात संपन्न होत आहे. दिनांक १ फेब्रुवारी २०२६ भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा समारोप करण्यात येणार आहे. कथेच्या सांगता समारोप च्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन हे जनविकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हारूणभाई इनामदार व केज नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या वतीने करण्यात येणार आहे. तरी केज,धारूर, आंबेजोगाई, कळंब सह परिसरातील भाविक भक्त व नागरिकांनी या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक भगवान श्रीकृष्ण आश्रम भक्त परिवार केज यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला तडा जाणार नाही,असे काम करु ग्रंथाशिवाय तरणोपाय नाही,नगरसेवक ॲड.अतिश चिकटे

लातूर :- लातूरच्या मतदारांनी कॉंग्रेस-वंचित बहुजन आघाडीला भरभरुन मतदान करुन मोठा विश्वास व्यक्त केला आहे,त्या विश्वासाला तडा जाणार नाही असे कार्य आम्ही सर्व नगरसेवक करु अशी ग्वाही देवून, नागरिकांनी जीवनाला चांगला आकार येण्यासाठी ग्रंथाचे वाचनही करावे,असे आवाहन नगर सेवक ॲड.अतिष चिकटे यांनी येथे केले.

स्वातंत्र्य संग्राम सैनिक नगरातील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन,मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित काव्य वाचन,मराठीतील साहित्यिकांचा सत्कार व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून सत्काराला उत्तर देताना ॲड.चिकटे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक गुडेकरीकार अमृतराव सुर्यवंशी हे होते,मंचावर दुसरे सत्कार मूर्ती नगरसेविका निकीता रोहित सोमवंशी,कवी रमेश हणमंते,ॲड.रोहित सोमवंशी यांची उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय परिश्रमाने या देशाला संविधान बहाल केले,त्याच्या गाभ्याला हात



लावण्याचा नादानपणा सत्ताधारी करण्याचा प्रयत्न करत आहेत,पण जनता आता जागी होत आहे,संविधान बदलले तर देश उध्वस्त होईल,संविधानाच्या रक्षणासाठी आम्ही रस्त्यावर येण्यासाठी मागेपुढे पाहणार नाही असे सांगून ॲड.चिकटे म्हणाले की, गेली काही वर्षात लातूर महापालिकेत प्रशासक राज असल्याने नागरिकांना नागरी सुविधा मिळत नव्हत्या,चुकीच्यापध्दतीचा कारभार चालला होता.म्हणून मतदारांनी आमच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेवून सत्ता दिली आहे,आम्ही सर्व सत्ताधारी नगरसेवक लातूरच्या सर्व प्रभागातील शेवटचा माणूस,नागरिकांना नागरी सुविधा मिळण्यासाठी संविधानाच्या चौकटीत राहून प्रामाणिकपणे काम करणार आहोत,नागरिकांनी केवळ नागरी समस्याच नाही तर दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांसाठी आम्हाला हाक द्यावी,त्यासाठी आम्ही सदैव उपलब्ध राहू,नव्हे लवकरच त्यासाठी मिसकॉल यंत्रणा सुरु करणार असल्याचे स्पष्ट केले.सार्वजनिक ग्रंथालये ही प्रबुध्द नागरिक घडविणारे माध्यम असल्याने वाचकांनी त्याचा लाभ घ्यावा,वाचनसंस्कृती वाढीसाठी शक्य तेवढी मदत करु अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

नगरसेविका निकीता सोमवंशी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा देवून प्रभागातील समस्या सोडविण्यास कटिबध्द असल्याचे सांगितले..अध्यक्षीय समारोपात अमृतराव सुर्यवंशी यांनी संविधानाचे रक्षण करण्यासाठी जागरुक राहण्याचे आवाहन केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने मराठी भाषेच्या माध्यमातून आपल्या कविता,कथा लेखनातून प्रसार प्रचार करणारे साहित्यिक रमेश हणमंते यांनी यावेळी आपल्या बहारदार कविता सादर करुन वाचकांच्या टाळ्या मिळवत,मराठी भाषेचे संवर्धन करावे असे आवाहन केले..

प्रारंभी संविधान निर्माते भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण अभिवादन करुन,ॲड.अतिष चिकटे व निकीता सोमवंशी यांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे रोहण करण्यात आले. राष्ट्रगीत आणि भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.त्यानंतर मान्यवरांचे ग्रंथ,पुष्पमाला देवून वाचनालयाच्या उपाध्यक्षा कल्पना गायकवाड, ग्रंथपाल अंजुषा काटे यांनी सत्कार केला.सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी प्रास्ताविक व सूत्रसचांलन केले. लिपिक संकेत होळीकर यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला वाचक नरेंद्रकुमार गायकवाड,महादेव राऊत,माजी आरोग्य अधीक्षक लता राहेरकर,वैजनाथ माने,प्रियंका माने,यशवंत गायकवाड,इंदू बनसोडे,नितीन माने,राजू माने,गणपत वाव्हळे यांच्यासह अनेक बालवाचक उपस्थित होते.

## प्रमोद उबाळे यांना डॉ. बी. आर. आंबेडकर आंतरराष्ट्रीय सर्वोत्कृष्ट सामाजिक सेवा पुरस्कार २०२६

लातूर :- सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय व निस्वार्थ कार्य करणारे जि. लातूर येथील कवी-लेखक तथा सम्राट अशोक साहित्य व सांस्कृतिक मंचचे संस्थापक अध्यक्ष मा. प्रमोद धर्मराज उबाळे यांना डॉ. बी. आर. आंबेडकर आंतरराष्ट्रीय सर्वोत्कृष्ट सामाजिक सेवा पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले.




हा भव्य पुरस्कार सोहळा रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ रोजी आनंथा रेसिडन्सी सभागृह, कलबुर्गी (कर्नाटक) येथे उत्साहात पार पडला. टोलोसा मेक्सिको विद्यापीठ (युनायटेड किंगडम) तसेच इउढत इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक अशा विविध क्षेत्रांत सातत्याने केलेल्या भरीव कार्याची दखल घेत निवड समितीने सखोल आढावा घेऊन हा सन्मान मा. उबाळे यांना प्रदान केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तामिळनाडू येथील डॉ. व्ही. कट्टाबोमन सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. एन. गायकवाड (चेंरमन, गुलबर्गा विद्यापीठ) आणि डॉ. शंकरप्पा एस. हत्ती (सेवानिवृत्त प्राचार्य, शासकीय महाविद्यालय, कलबुर्गी) उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रस्तावना विद्यापीठ समन्वयक मा. दिलीपकुमार सर यांनी मांडली.

यावेळी टोलोसा मेक्सिको विद्यापीठ (युनायटेड किंगडम) चे देश संचालक डॉ. व्ही. कट्टाबोमन सर, आंतरराष्ट्रीय शिक्षणतज्ञ माणिकराव डोळे सर, डॉ. अनिल मोरे (बिदर) तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्वान व उच्चशिक्षित प्रेक्षकांमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

पुरस्कार प्रदान करताना प्रमुख पाहुण्यांनी मा. प्रमोद धर्मराज उबाळे यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील निष्ठावंत कार्याचे विशेष कौतुक केले आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावर सामाजिक कार्याची ओळख निर्माण होत असल्याचे नमूद केले.

सन्मान स्वीकारताना मा. उबाळे म्हणाले, हा पुरस्कार मला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देणारा आहे. हा माझ्या कार्याची पोचपावती असली तरी अजून खूप काम बाकी आहे. येणाऱ्या काळात आम्ही नवीन सामाजिक प्रकल्प सुरू करणार आहोत.

या आंतरराष्ट्रीय सन्मानाबद्दल त्यांच्या कुटुंबीयांनी, मित्रपरिवाराने, सगे-सोयऱ्यांनी व वरिष्ठांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. हा क्षण कुटुंबासाठी आनंददायी व अभिमानास्पद असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.


यापूर्वीही मा. प्रमोद धर्मराज उबाळे यांना अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून ते सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील प्रचार-प्रसारासाठी सातत्याने कार्यरत आहेत.

या पुरस्कार सोहळ्यानिमित्त डॉ. व्ही. कट्टाबोमन, डॉ. एस. एन. गायकवाड व डॉ. शंकरप्पा एस. हत्ती यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे तसेच भारतीय संविधानाच्या महत्त्वाचे सखोल विवेचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावी व बहारदारपणे मा. दिलीपकुमार सर यांनी पार पाडले. संपूर्ण सोहळा उपस्थित सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

## मंत्री गिरीश महाजन यांच्याविरोधात लेखी तक्रार दाखल.

विशेष प्रतिनिधी - मंत्री गिरीश महाजन यांच्याविरोधात तक्रार दाखल दरम्यान,नाशिकमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित शासकीय कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांनी केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेतल्याबाबत वन विभागाच्या कर्मचारी माधवी जाधव आणि दर्शना सौपुरे यांनी जाहीरपणे आक्षेप नोंदवला. भाषणादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव का घेतले नाही? असा सवाल त्यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित मंत्री महाजन यांच्यासमोर उपस्थित केला. या घटनेमुळे कार्यक्रमात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत माधवी जाधव आणि दर्शना सौपुरे या दोघींना ताब्यात घेऊन सरकारवाडा पोलीस ठाण्यात आणले.



या घटनेनंतर या दोघींच्या समर्थनार्थ नागरिकांनी पोलीस ठाण्याबाहेर एकत्र येत मंत्री गिरीश महाजन यांच्याविरोधात घोषणाबाजी केली. यावेळी महाजन यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली. दरम्यान, माधवी जाधव आणि दर्शना सौपुरे यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्याविरोधात लेखी तक्रार दाखल केली असून, या प्रकरणी पोलीस पुढील कारवाई करत आहेत. तसेच,वनरक्षक कर्मचारी महिलांकडून ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भाजपाचे सर्वच सक्षम उमेदवार बहुमताने विजयी होणार,रेणापूरसह लातूर पंचायत समिती भाजपच्या ताब्यात येणार आ. रमेशआप्पा कराड

लातूर - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपाच्या वतीने सर्वच सक्षम उमेदवार देण्यात आले असून मतदार संघात केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर निश्चितपणे भाजपाचे उमेदवार बहुमताने विजयी होणार त्याचबरोबर रेणापूरसह लातूर पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात येणार असल्याचा आत्मविश्वास भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केला.



ग्रामीण भागाच्या विकासासाठी मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून या निवडणुकीकरिता लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने सर्वच जागेवर सक्षम आणि प्रभावी उमेदवार देण्यात आले असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी २७ जानेवारी मंगळवार रोजी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी अधिकृत उमेदवाराची यादी जाहीर केली आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे अधिकृत उमेदवार काटगाव जिप गट सौ. पूर्वादेवी नाथसिंह देशमुख, काटगाव पस गण सौ. शितल दत्ता लटपटे, गातेगाव पंस गण समाधान जगन्नाथ पवार, मुरुड जिप गट सौ. रंजना बळीराम हिंगले, मुरुड १ पंस गण उद्धव सूर्यभान चव्हाण, मुरुड २ पंस गण सौ. मनिषा सचिन देवकर, एकुर्गा जिप गट साहेबराव ज्ञानोबा मुळे, एकुर्गा पंस गण सौ. स्वाती किशोर घुटे, अंकुली पंस गण संजय श्रीमंत सूर्यवंशी, तांदूळजा जिप गट दिपक भागवत वांगसकर, तांदूळजा पंस गण सौ. सुचिता अंकुश गणगे, गाधवड पंस गण बाबासाहेब साहेबराव भिसे, निवळी जिप गट कु. मयुरी श्रीराम आदमाने, निवळी पंस गण सूर्यकांत भिवा सोनवणे, चिंचोली (ब) पंस गण सौ. रेखा श्रीकांत देशमाने, भातांगळी जिप गट महादेव गुलाब साळुंके, भातांगळी पंस गण पांडुरंग अशोक बालवाड, बोरी पंस गण सिंदूबाई राजेंद्र खुरदळे, पानगाव जिप गट सतीश रावसाहेब आंबेकर, पानगाव पंस गण रंजना मारुती गालफाडे, कोष्टगाव पंस गण सौ. जयश्री संजय डोंगरे, कामखेडा जिप गट सौ. सरिताताई शंकरराव भिसे, कामखेडा पंस गण शरद माणिकराव दरेकर, मोटेगाव पंस गण संतोष मुरलीधर चव्हाण, खरोळा जिप गट शिवकन्या महेंद्र गोडभरले, खरोळा पंस गण सौ. शितल प्रताप राऊतराव, कारेपूर पंस गण अंजली राजेश काळे, पोहरेगाव जिप गट सौ. मनिषा दशरथ सरवदे, पोहरेगाव पंस गण आकाश राजेंद्र भुतके, निवाडा पंस गण विष्णू सोपानराव गोरे, भादा जिप गट सौ. छाया पदमाकर चिंचोलकर, भादा पंस गण बळीराम काकासाहेब साळुंके, बोरफळ पंस गण भाग्यश्री कृष्णा साळुंके यांचा समावेश आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावे इतर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदार संघात समाविष्ट असून त्यातील भाजपाचे उमेदवार महाराणाप्रताप नगर जिप गट सोमनाथ विठ्ठल वाघमारे, महाराणाप्रताप नगर पंस गण सौ. रेशमा अतुल होळकर, बाभळगाव पंस गण सौ. रजनीगंधा संजय अडसूळ, हरंगुळ (बु) जिप गट सौ. सरिता रवींद्र काळदाते, हरंगुळ (बु) पंस गण प्रशांत नागनाथ खोबरे, हरंगुळ (खु) पंस गण किरण सुरेश रोंगे, आर्वी जिप गट वैशाली चंद्रकांत लोंढे, आर्वी पंस गण सौ. विजया उदय गोजमगुंडे, महापूर पंस गण माणिक निवृत्ती आलुरे, पाखरसांगवी जीप गट सौ. अश्विनी बाबू खंदाडे, पाखरसांगवी पंस गण उमेश सिद्धेश्वर हंडरगुळे, गंगापूर पंस गण सौ. तनुजा धीरज पाटील, शिवली पंस गण सौ. प्रणिता राजकिरण साठे, तुंगी पंस गण परमेश्वर श्रीमंत लांडगे याप्रमाणे उमेदवारी देण्यात आली आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेचे भाजपाच्या पाठीशी मोठे समर्थन असल्याचे सांगून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, आजपर्यंत झालेल्या विविध विकास कामाच्या आधारावर आणि भविष्यात करावयाच्या कामाच्या नियोजनामुळे ग्रामीण मतदारसंघातील जिल्हा परिषदेचे भाजपाचे उमेदवार बहुमताने विजयी होणार असून रेणापूरसह लातूर पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही असे बोलून दाखविले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने काम करून भाजपाचे उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी व्हावेत यासाठी प्रभावीपणे प्रचार यंत्रणा राबवावी. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून झालेल्या विकास कामांची जाणीव मतदारांना करून द्यावी असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

## केज येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला गत वैभव प्राप्त करण्यासाठी ६०० माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार

केज/प्रतिनिधी.-केज येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला गत वैभव प्राप्त करण्यासाठी ६०० माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार घेतला असून या माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून शाळेत सकाळी ध्वजारोहण, माजी विद्यार्थ्यांनी केज शहरातून प्रभात फेरी काढून दिवसभर शाळेत विविध कार्यक्रम घेतले आहेत.

या शाळेमधील माजी विद्यार्थी हे डॉक्टर, वकील, शिक्षक, इंजिनीयर, कलेक्टर, तहसीलदार, तलाठी, ग्रामसेवक यासह अनेक पदावर मोठ-मोठे अधिकारी झालेले आहेत.

केज शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ही तालुक्यातील नामांकित शाळा म्हणून या शाळेची ओळख होते परंतु मागील दोन ते तीन वर्षापासून ही शाळा मोडकळीस आलेली



आहे या शाळेमध्ये विद्यार्थी नसल्याने ही शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला गत वैभव मिळवून देण्याकरिता माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला आहे. जून २०२६ या शैक्षणिक वर्षात या शाळेला गत वैभव प्राप्त करण्यासाठी सर्व माजी विद्यार्थी ताक्तीने व जोमाने कामाला लागले आहेत.या माजी विद्यार्थ्यांनी सध्या शाळेच्या रंगरंगोटी सह इतर कामे मोठ्या प्रमाणात केले आहेत. या माजी विद्यार्थ्यांनी केज शहरात प्रभात फेरी काढून शहरातील नागरिकांना आपली मुले, नातवंड यांचे येणाऱ्या शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत डमिशन करावे असे आवाहन केले आहे.

# संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांचा आदर करत भारताला जगातील सर्वश्रेष्ठ राष्ट्र बनवूया- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर :- आपल्या देशाच्या इतिहासात



२६ जानेवारी १९५० हा अत्यंत गौरवाचा दिवस आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले भारतीय संविधान अंमलात आले. आपला देश लोकशाही प्रजासत्ताक बनला. या संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांचा आदर करत आपण सर्वजण आपल्या भारत देशाला जगातील सर्वश्रेष्ठ राष्ट्र बनविण्यासाठी कटीबद्ध होवुया, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे राष्ट्रध्वज वंदनेचा मुख्य शासकीय समारंभ झाला. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ,



पाच हजार विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध कवयात ठरली लक्षवेधी !प्रजासत्ताक दिनानिमित्त लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित मुख्य शासकीय कार्यक्रमात सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर गीतावर आधारित भव्य कवायत सादरीकरण केले. शिक्षण विभागामार्फत आयोजित या उपक्रमात शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. या उपक्रमासाठी शिक्षणाधिकारी माध्यमिक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी प्राथमिक तृप्ती अंधारे यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक यांनी योगदान दिले.

उपजिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी यांच्यासह स्वातंत्र्य सेनानी, त्यांचे कुटुंबीय, वीरमाता, वीरपत्नी, वीरपिता, माजी सैनिक, पत्रकार, नागरिक व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले, २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान अंमलात आले, आपला देश सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक बनला. जनतेच्या हातात सत्ता देणारे, प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची हमी देणारे आपले संविधान जगातील सर्वांत मोठे लिखित संविधान म्हणून ओळखले जाते. भारतीय संविधान हे केवळ कागदावरचे शब्द नाहीत, तर ते आपल्या सामूहिक आकांक्षांचे, स्वप्नांचे आणि मूल्यांचे दस्तऐवज असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय संविधानाने आपल्याला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची हमी दिली. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, धर्म आणि उपासना यांचे स्वातंत्र्य दिले. लिंग, जाती, धर्म, जन्मस्थान यांच्या आधारावर भेदभाव न करण्याची हमी दिली. आपला तिरंगा ध्वज हा स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे, शहीदांच्या रक्ताचे आणि संविधानाच्या मूल्यांचे प्रतीक आहे. जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, सुरक्षितता यांची हमी देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही पालकमंत्री श्री. भोसले यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने दिली.

पालकमंत्री श्री. भोसले यांनी यावेळी पोलीस परेडचे निरीक्षण केले. उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी पोलीस परेडचे नेतृत्व केले. पोलीस पथकांसह गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्र सेना, पोलीस बॅण्ड पथक, श्वान पथक, वज्र वाहन, बॉम्ब शोधक पथक, जलद प्रतिसाद पथक, रुग्णवाहिका, आपत्ती व्यवस्थापन कक्ष पाठक यासह विविध शासकीय विभागांचे १० चित्ररथ या पथसंचालनात सहभागी झाले होते.

प्रजासत्ताक दिन सोहळ्याला उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या वीर पत्नी, वीरमाता, वीरपिता यांची पालकमंत्री श्री. भोसले यांनी भेट घेवून त्यांचा सत्कार केला, तसेच त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे जनता भरडली;धडा शिकविण्यासाठीची हीच ती वेळ.

लातूर :---काँग्रेस पक्षाने नेहमीच



सर्वसामान्य नागरिकाला केंद्रबिंदू मानून काम केले असून जनतेने दाखवलेला विश्वास कधीही तडा जाऊ दिला नाही, असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रेणापूर तालुक्यातील इंदरठाणा, आरजखेडा, सांगवी आणि दर्जीबोरगाव येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.

यावेळी बोलताना देशमुख म्हणाले की, भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे जनता भरडली जात असून जनतेचे वाटोळे करणा-या भाजपला धडा शिकवण्यासाठीची हीच ती योग्य वेळ आली आहे.भाजपच्या ताब्यात लातूर जिल्हा परिषद असताना केवळ आणि केवळ भ्रष्टाचारच झाला असल्याचे ग्रामीण भागातील मतदार ठामपणे सांगत आहेत. विकासकामांच्या नावाखाली निधीचा गैरवापर करण्यात आला असून अनेक कामे कागदावरच राहिली आहेत, असा आरोप त्यांनी केला.

याउलट काँग्रेस पक्षाने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली असून रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकासाच्या अनेक योजना प्रभावीपणे राबवण्यात आल्या आहेत. या विकासकामांची सविस्तर यादी भाजपवाल्यांना दाखवण्यासाठी आम्ही तयार आहोत, रेल्वे कोच फॅक्टरीच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी सांगितले की, या प्रकल्पातून स्थानिक तरुणांना रोजगार दिला जाईल, अशी आश्वासने भाजपने दिली होती. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस भरती न झाल्याने भाजपने जनतेची दिशाभूल करून फसवणूक केली आहे. त्यामुळे तरुणांमध्ये तीव्र नाराजी आहे.

भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक गंभीर झाले असून सर्वसामान्य जनता भरडली जात आहे, असा आरोपही त्यांनी केला. बेरोजगारी वाढवणाऱ्या भाजप सरकारला तरुणांनी जाब विचारायला हवा, असे आवाहन करत काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना संधी देण्याचे आवाहन त्यांनी केले.

तसेच आगामी काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या माध्यमातून महिलांसाठी स्वयंरोजगार योजना, शेतकऱ्यांसाठी सिंचन सुविधा, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत आणि आरोग्य सेवांचा विस्तार करण्याचा काँग्रेसचा निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रचार सभांना काँग्रेसचे उमेदवार, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील सर्व काँग्रेस आघाडी उमेदवारांना निवडून देऊन विकासाची गती पुन्हा एकदा सुरू करण्याचे आवाहन धिरज विलासराव देशमुख यांनी केले.

## येवता ग्रामपंचायतचा लाखोंचा घोटाळा ग्रामभेत आला चव्हाट्यावर काम न करता बील उचलल्याचा नागरिकांनी केला आरोप

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील येवता




येथील ग्रामपंचायतचा लाखोंचा घोटाळा ग्रामभेत चव्हाट्यावर आला असून चक्क काम न करताच बील उचलल्याचा नागरिकांनी केला आरोप आहे तर सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांची नागरिकांनी केली बोलती बंद, सरपंचांनी चक्क उपसरपंचालाही अंधारात ठेवले आहे असे ग्रामसभेमध्ये नागरिकांनी उघडकीस आणले आहे. विद्यमान सरपंचाने एका निराधार महिलेचे लाईट साठी दोन हजार रुपये खुद सरपंच विलास अप्पा ने घेतले व रोजगार हमी योजनेतून विहिरीसाठी पाच हजार १० हजार रुपये घेतले असल्याचा आरोप ग्रामसभेमध्ये जनतेने केला आहे. सरपंचाच्या भ्रष्ट कामाचा ग्रामसभेत नागरिकांनी पाडाच वाचून दाखवला आहे व अशा असंख्य नागरिकांकडून पैसे घेतले अशी चर्चा केली जात आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील प्रतिष्टीत मानली जाणारी येवता येथील ग्रामपंचायत या ग्रामपंचायतीचे सरपंच विलास अप्पा जोगदंड यांनी गेल्या साडेचार ते पाच वर्षांमध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे समोर रोजी झालेल्या ग्रामसभेत उघड झाले आहे.

ग्रामपंचायत अंतर्गत झालेले कामे ही निकृष्ट दर्जाची असून सदरील ग्रामसभेत जनतेने विचारलेल्या प्रश्नाला एकही उत्तर हे सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांना देता आल नाही. सदरील कामे कोठे केली हे विचारले असता उडवा उडवीची उत्तर देण्याचा प्रयत्न ग्रामविकास अधिकारी यांनी केला तर ग्रामसभेत जनतेने अर्जाद्वारे हिशोब मागितला असता सधा हिशोब देता येणार नाही असे उत्तर ग्रामविकास अधिकारी यांनी दिले. येवता गावांतर्ग झालेला सिमेंट रस्ता व अंडरग्राउंड नालीचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आणून दिले,तसेच काही ठिकाणी हाय मास न बसवतात लाखोचा रुपयांचा ऐवज उचलून घेतल्याचेही ग्रामसभेत निदर्शनास आणून दिले अशा भ्रष्ट सरपंचावर प्रशासन कार्यवाही करणार का? हाच आता प्रश्न नागरिकांना पडला आहे. येवता ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशन विहिरीचे खोदकाम न करताच जुनी दलित वस्तीची विहीरीची दुरुस्ती दाखवून लाखो रुपयांचा ऐवज संबंधित गुत्तेदार व सरपंच यांच्या संगनमताने झाल्याचेही ग्रामसभेत उघडकीस आले आहे. अशा विविध प्रकारच्या विविध योजना हडप केल्याचेही आजच्या ग्रामसभेत निष्पन्न झाले तसेच दोन हजार रुपये प्रमाणे ५० सिमेंटच्या बाकड्यासाठी ४ लाख २१,१८२ रुपये उचलले हाय मास लाईट एलईडी साठी ५ लाख ४२,१७९ रुपये उचलले असे विविध अंगणवाडी फर्निचर व दुरुस्ती दवाखाना फर्निचर,पाणी फिल्टर साठी अशा इतर विविध योजनेसाठी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे २६ जानेवारी रोजी झालेल्या ग्रामसभेच्या माध्यमातून उघड झाल्याने सरपंच यांची बोलती बंद झाली. या झालेल्या भ्रष्टाचाराकडे प्रशासन गांभीर्याने लक्ष देईल का?हेच पाहणे आता उत्सुकतेचे ठरणार आहे.

## ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या उपअभियंताच्या विरोधात प्रजासत्ताक दिनी बाळासाहेब गलांडेने आत्मदहन करण्याचा केला प्रयत्न

केज/प्रतिनिधी-केज पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या उपअभियंताच्या विरोधात प्रजासत्ताक दिनी बाळासाहेब गलांडे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ

केज पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी अभिमान राठोड, केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक इनामदार, चिंचोली माळी चे बीट अंमलदार श्री बांगर, गुप्त शाखेचे शिवाजी कागदे, शहर बीटचे श्री सोपने, भाजपाचे तालुकाध्यक्ष भगवान केदार, पत्रकार बांधव व ग्रामस्थांच्या मध्यस्थीने आणि कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड चे श्री बिडकर यांच्या लेखी आश्वासना नंतर बाळासाहेब गलांडे यांनी त्यांचे आंदोलन हे तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे जलजीवन योजना, मिशन अंतर्गत केलेल्या कामामध्ये अनाधिकृतपणे राज्य मार्गावर ग्रामीण मार्गावर खोदकाम केल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग केज व जिल्हा परिषद बांधकाम विभाग केज यांच्याकडून संबंधित गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई करून तात्काळ दंड वसूल करावा असे पत्र ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाला दिलेले असताना त्या पत्रावर मार्च २०२४ च्या अधिवेशनामध्ये आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांनी अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न उपस्थित केला असताना देखील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग यांनी आकारलेला दंड हा कार्यकारी मुख्य अधिकारी यांनी केजच्या उपअभियंताच्या शिफारशीवरून माफ करून





घेतल्याचे सांगण्यात आले आहे असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने बाळासाहेब गलांडे हे मागील दोन वर्षापासून सतत लेखी व तोंडी पाठपुरावा संबंधित विभागाकडे करत आहेत परंतु वेळोवेळी संबंधित विभागाच्या उपअभियंता त्यांना केराची टोपली दाखवली आहे असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. संबंधित विभागाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना काही चुकीचे अहवाल देऊन संबंधित गुत्तेदारांना पाठीशी घालण्याचे काम केलेले आहे संबंधित गुत्तेदार व संबंधित उपअभियंताच्या विरोधात वरिष्ठ कार्यालयाशी गलांडे हे सतत लेखी तक्रार करत आहेत व त्याचा पाठपुरावा करत आहेत. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांनी आकारलेला दंड तारांकित प्रश्नाच्या उत्तरांमध्ये कसलाही उल्लेख केला नाही सदरची माहिती ही अंधारात ठेवून विधानभवनाची देखील फसवणूक करण्यात आलेली आहे असे असताना बाळासाहेब गलांडे हे मागील चार महिन्यापासून त्यांनी वेळोवेळी दिलेल्या तक्रारीवर आझ पर्यंत काय? कार्यवाही केली आहे. वेळोवेळी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती विचारली असता वरिष्ठांचे नाव सांगून श्रीमती साळवे यांनी प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला म्हणून बाळासाहेब गलांडे यांनी दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,पंचायत समिती केज यांच्याकडे रीतसर अर्ज करून मला आठ दिवसाच्या आत माहिती द्या अन्यथा मी दिनांक २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी रोजी पंचायत समितीच्या आवारात आत्मदहन करेन अशा इशारा देऊनही उपअभियंता श्रीमती साळवे यांनी सदर आंदोलनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून माहिती लपवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला विशेष म्हणजे उपअभियंता श्रीमती साळवे या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत २६ जानेवारीच्या ध्वजारोहणास व आंदोलन स्थळी अनुपस्थित राहिल्या आहेत. उपअभियंता यांनी मला आंदोलनापासून परावर्त करण्यासाठी कसलाच पत्र व्यवहार अथवा माझी समज त काढली नाही. माझ्याशी कसल्याच प्रकारे आंदोलनाच्या संदर्भात चर्चा देखील केली नाही याउलट मी सतत त्यांच्या कार्यालयात त्यांना भेटण्यासाठी जात होतो परंतु त्या कधीही कार्यालयात उपस्थित असल्याचे मला निदर्शनास आले नाही व भेटल्या नाहीत. असा आरोप गलांडे यांनी केला आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.